# लेखक आणि आजचा काळ

*(दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये १ नोव्हेंबर रोजी बुद्धिजीवी, व्यावसायिक, साहित्यिक, पत्रकार, कलाकार अशा संवेदनशील व्यक्तींनी देशातील वाढती हिंसा व असहिष्णुता याचा निषेध व विरोध व्यक्त करण्यासाठी प्रतिरोध ही सभा आयोजित केली होती. या प्रसंगी ज्येष्ठ इतिहासकार रोमिला थापर यांनी भाषण केलं. त्यांनी सध्या पुरस्कार परत करणाऱ्यांवर होणारे आरोप खोडून काढत विवेकाचा विचार जागृत ठेवला. त्यांच्या भाषणाचा संपादित अंश..)*

माझं वय आता ८४ वर्षं आहे. २८ वर्षांची असल्यापासून मी एक शिक्षिका आहे. भारतातल्या अनेक महाविद्यालयांत मी व्याख्यानं दिली आहेत. इतरही अनेक ठिकाणच्या सर्वोत्तम विद्यापीठांत मी व्याख्यानं दिली आहेत. मागच्याच आठवड्यात मी मुंबईतील एका महाविद्यालयात व्याख्यान दिलं. आयुष्यात पहिल्यांदाच व्याख्यानापूर्वी पोलिसांनी मला फोन केला आणि पोलीस संरक्षण देण्याचा आग्रह धरला. स्वातंत्र्य मिळून ६८ वर्षं होऊनही एका शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासक व्यक्तीला धर्मनिरपेक्षता या विषयावर शैक्षणिक व्याख्यान देणं पोलीस संरक्षणाशिवाय शक्य नाही! एक राष्ट्र आणि एक समाज म्हणून आपण स्वत:ला किती कमी करून घेतलं आहे! ही काय अभिमान वाटण्यासारखी बाब आहे?
वाढती हिंसा आणि असहिष्णुतेचा प्रश्न मांडणाऱ्या लोकांच्या निषेधाला सत्ताधारी पक्षाकडून टोमणे मारले जाताहेत. याला ते जाणीवपूर्वक रचलेला कृत्रिम विद्रोह असं म्हणताहेत. रचना करणं म्हणजे हातांनी बनवणं. आणि जे असं बनवलेलं असतं ते अस्तित्वात असतं आणि खरं असतं. हा निषेध असा अचानक वाढलेला नाही. आपला समाज आणि मूल्यं सध्या ज्या रीतीनं चिरडले जातायत, ते ज्यांना पसंत नाही अशा अनेक भारतीयांची ही उत्स्फूर्त वेदना आहे. विविध व्यवसायांतील लोकांकडून हा निषेध देशात सगळीकडं नोंदवला गेला आहे, नोंदवला जात आहे. केवळ डाव्या विचारसरणीच्या लोकांकडून नव्हे, तर अगदी मोठमोठे उद्योगपती, रिझर्व्ह बँकेने गव्हर्नरही तो नोंदवतायत. अरुण जेटली जसं निषेध करणाऱ्यांचं वर्णन करतायत तसे हे लोक नाहीत. कल्पना कितीही ताणली तरी यांना पक्के भाजपविरोधी म्हणता येणार नाही. म्हणूनच तेसुद्धा आजच्या काळाला आत्यंतिक अस्थिर नागरी समाज असं का म्हणतायत हे सरकार त्यांना का विचारत नाही? त्यांना विद्रोही म्हणणं याला केवळ विचित्र असंच म्हणता येईल. विद्रोह म्हणजे शासनाच्या अस्तित्वाविरुद्ध एक चळवळ असते. आमची मागणी अशी आहे की भारतीय समाजाला ग्रासून टाकणाऱ्या हत्या आणि अराजक संपवण्यासाठी योग्य असं प्रशासकीय नियंत्रण असलं पाहिजे. शासनाचे प्रमुख या नात्यानं राष्ट्रपतींकडे आम्ही ही विनंती करतो आहोत.
तर मग मी आणि इतर अनेकजण कशाचा निषेध करतो आहोत? आमचा अशा परिस्थितीला आक्षेप आहे, तिथं पुस्तकांवर बंदी घातली आहे. जिथं भाजपचे ज्येष्ठ सदस्य पुस्तक जाळण्याची मागणी करताहेत. जसं माझ्या पुस्तकाबाबतीत झालं. विदेशी नीतीच्या मुद्यांवर चर्चा करू इच्छिणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर शाई फेकली जातेय. विवेकवादी विचारवंतांचे खून होतायत. स्वत:ला हवं ते खाण्याचा हक्क व्यक्त केल्याच्या अफवेतून माणसांना ठार मारलं जातंय. सत्तेत असणाऱ्या पुरुषांची मानसिकता मुक्त स्त्रीची संकल्पना स्वीकारू शकत नाही. त्यामुळेच स्त्रियांवर दररोज होणाऱ्या बलात्कारांबद्दल काहीही स्पष्टीकरणं दिली जातायत आणि अधिक चांगल्या जीवनाची आकांक्षा करण्याची हिंमत केल्याबद्दल दलितांना क्रूरपणे ठार मारलं जातंय. आम्ही ज्यांचा निषेध करतो आहोत ती कृत्यं नवी नाहीत. पूर्वीही अशा तुरळक घटना घडत असत, आणि प्रत्येक वेळी आमच्यापैकी अनेकांनी त्यांचा निषेध केला आहे. पूर्वी ते केवळ कायदा

आणि सुव्यवस्थेचे प्रश्न म्हणून निकालात काढले जात. मागच्या वर्षी मात्र अशा कृतींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. दहशत, भीती, हिंसा आणि टोकाच्या विसंवादाचं वातावरण ही संघ परिवाराच्या झाकलेल्या संघटनांची कृती आहे. आम्ही त्यांना कट्टर तत्त्व म्हणतो. हा आता केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न राहिलेला नाही. हा समाजावर, विशेषत: प्रत्येकाच्या मनात भय निर्माण केलेल्या, धमकावलेल्या लोकांवर नियंत्रण करण्याचा प्रयत्न आहे.एखाद्या राज्यात कोणता पक्ष सत्तेत आहे हा प्रश्न अप्रस्तुत आहे. हे सर्व घडतं कारण प्रशासनाचा प्रभाव कमी झाला आहे. अलीकडील काळात ही घसरण कोणाला माहीत नव्हती असं नव्हे. पण ती आता अतिशय स्पष्ट दिसू लागली आहे. ही कट्टर तत्त्वं गोळ्या घालतायत. लोक विचारतायत, असे गुन्हे रोखण्याची ताकद आणि अधिकार कोणाकडे आहेत की नाही? की एकूणच असं मौन चालू राहणार आहे? केंद्र सरकार नक्कीच राज्य शासनांकडे प्रभावीपणे तक्रार करू शकेल आणि स्वत:च्याच पक्षातील कट्टर घटकांवर खात्रीनं नियंत्रण करू शकेल.

आम्ही पूर्वी कधीच असा निषेध केला नाही. आम्ही फक्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्या हिंदू राष्ट्र व हिंदू धर्माच्या संकल्पनेचा निषेध केला आहे, इतरांच्या नाही, आणि आम्ही टोकाचे भाजपविरोधी आहोत , असे आरोप आमच्यावर केले जातायत. मी पूर्वी ज्या ज्या प्रसंग आणि घटनांचा निषेध केला आहे त्याची यादी इथं देण्याची संधी मी घेते. आणि हे केवळ माझ्याबाबतीत नाही, तर आमच्यापैकी बहुतेक जणांचा बाबतीत लागू होतं.

मी १९७५ सालच्या आणीबाणीचा निषेध केला होता आणि इंदिरा गांधींनी माझ्यावर त्याचा राग काढला होता. नेहरूंचा आदर करत असूनही मी त्यांना पाठिंबा दिला नव्हता. १९८४ साली झालेल्या शिखांच्या कत्तलीचा मी निषेध केला होता आणि त्याची चौकशी करण्याच्या प्रयत्नाला पाठिंबा दिला होता. सलमान रश्दींच्या विरुद्ध काढलेल्या फतव्याला मी आक्षेप घेतला होता. राम जन्मभूमीचा तथाकथित इतिहास आणि बाबरी मशीद उदध्वस्त करण्याचा मी निषेध केला होता. आमच्यापैकी काही जणांनी त्याबद्दल The Anatomy of a Confrontation हे पुस्तकही लिहिलं होतं. पण प्रसारमाध्यमं आणि सरकारचा पुस्तकं वाचण्याशी काही संबंध नाही. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आणि त्यांच्या नंदिग्राममधील कारवायांचा मी अनेक इतिहासकारांसोबत निषेध केला होता. २००५ साली जेव्हा पहिलं संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार सत्तेत होतं, तेव्हा आमच्यापैकी अनेकांनी विविध समित्या, संस्था आणि अकादमीसारख्या व्यावसायिक संस्था अजूनही शासनाच्या नियंत्रणाखाली असण्याचा निषेध केला होता. या संस्था स्वायत्त कराव्यात व मतांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नेमलेल्या शासन नियुक्त सदस्यांऐवजी त्या व्यावसायिक व्यक्तींनी चालवाव्यात अशी मागणी केली होती. आणि अगदी अलीकडे ए. आर. रहमान यांचा धिक्कार करण्याच्या फतव्याचाही मी निषेध केला होता. इतिहासावर जाडजूड खंड लिहिण्यात आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य व मानवी अधिकारांचा संकोच करण्याविरुद्ध सक्रियपणे निषेध करण्यात मी माझं आयुष्य व्यतीत केलं. तरीही कधीच निषेध न केलेली व्यक्ती असं माझं वर्णन केलं जात आहे. ज्यांच्यावर पूर्वग्रहदूषित असल्याचा आरोप करताहेत, त्यांच्या बाबतीत भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि प्रसारमाध्यमं थोडंसं होमवर्क का नाही करत? प्रसारमाध्यमं आणि राजकीय पक्ष जेव्हा लोकांबद्दल असं धादान्त खोटं सांगतात, तेव्हा त्यांच्याबद्दलचा सारा आदर नाहीसा होतो.

अगदी ताजा प्रसारमाध्यमांचा अहवाल असं सांगतो, की मला शासनानं दिलेले पुररस्कारही मी परत दिले. पण विनोदाची बाब ही आहे की मी कधी शासनाचे पुरस्कार स्वीकारले नाहीत. त्यामुळं माझ्याकडं परत देण्यासाठी काहीच नाही. पण या प्रश्नाबाबतीत एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. हे शासनसंस्थेचे पुरस्कार आहेत की सरकारचे? मी अगदी स्पष्टपणे सांगते की हे सरकारचे पुरस्कार आहेत. त्यामुळेच तर मी दोनदा काँग्रेस सरकारकडून पद्म पुरस्कार स्वीकारणं नाकारलं. दरवर्षी पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींची यादी पाहिली

तर कोणीही सांगू शकतं की कोणता राजकीय पक्ष सत्तेत आहे. पुरस्कार प्राप्त व्यक्तीच्या निवडीत जर गृह मंत्रालय आणि इतर विशेष मंत्रालयं सहभागी नसतील तरच त्यांना शासनसंस्थेचे पुरस्कार म्हणता येईल. त्यामुळं पुरस्कार परत करून राष्ट्राचा अपमान करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

केवळ आपल्या कळपांवर नियंत्रण करणं अशक्य झाल्यानंच भाजप निषेध करणाऱ्या व्यक्तींना डावे वा काँग्रेसने फूस लावलेले असं म्हणत आहे. अनेक जण डावे आहेत, पण अनेक जण नाहीत. हा निषेध केवळ याकरता आहे की समाज म्हणून आपल्या समोर आलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी एका उदारमतवादी अवकाशाची गरज आहे, आणि आपण सध्याचं हे भय कसं घालवू शकू. पेरूमल मुरूगनना आणखी एक कादंबरी लिहिणं सोडून का द्यावं लागलं? केवळ हिंदू मुनानी त्यांना असं करू देणार नाहीत म्हणून?

२०१४च्या निवडणुकांत आपल्याला विकासाच्या आदर्श राज्याचं वचन दिलं गेलं होतं. पण विकासाचा अर्थ हा होता का? विकास म्हणजे कोणताही नागरी समाज ज्याची मागणी करतो त्या मूलभूत मानवी अधिकारांकडे लक्ष देणं. अन्न, पिण्याचं पाणी, शिक्षण, आरोग्याची काळजी, रोजगार, नागरिक म्हणून समान हक्क आणि सामाजिक न्याय. यातलं काही आपल्याला मिळालं आहे? पूर्वीच्या संयुक्त पुरोगामी आघाडीनं यातलं खूप कमी केलं, असा आपण त्यांना दोष देत होतो. पण या सरकारकडूनही परिस्थिती आहे तशीच राहिली आहे. आणि मग आपल्याला उपरोधानं सांगितलं जातं आहे, की नागरी समाजानं देशातील दारिद्र्याकडं लक्ष दिलं पाहिजे. जर नागरी समाज या देशातील दारिद्र्य निर्मूलन करू शकत असेल तर आपल्याला सरकारची गरज काय?

प्रसारमाध्यमं आत्यंतिक महत्त्वाचा प्रश्नांवर चर्चा, वादविवाद करतात असं म्हणतात. प्रत्येक प्रश्नासाठी तिथे राजकीय पक्षांचे प्रवक्ते असतात. यामागं केवळ सवय हे कारण सोडलं तर इतर कोणतंच कारण दिसत नाही. ते एकमेकांवर इतक्या जोरजोरात, कानठळ्या बसतील असे ओरडत असतात, एकमेकांना इतक्यांदा मध्ये मध्ये थांबवतात, बोलूच देत नाहीत. हे जणू काहीच न म्हणण्यासारखं असतं. अलीकडे विख्यात वैज्ञानिक प्रा. बी. एम. भार्गव यांच्या बाबतीत एका राजकीय प्रवक्त्यानं जो अनादर दाखवला ते तर अतिशय वाईट आहे. प्रा. भार्गव एक अतिशय चांगला मुद्दा मांडत होते की, अलीकडील काळात ज्या वैज्ञानिकांनी निषेध व्यक्त केला ते विवेकवादी विचाराचं रक्षण, वैज्ञानिक जाणिवेची आवश्यकता यासाठी बोलले आहेत. त्यातील अनेक शास्त्रज्ञ हे वैज्ञानिक संस्थांचे प्रमुख आहेत. त्यांच्याबद्दल लोकांना प्रचंड आदर आहे. प्रा. भार्गव यांचे शेरे अतिशय उर्मटपणे खोडून काढले गेले. जर राजकीय व्यक्तींना उर्मट आणि असंवेदनशील असल्याशिवाय एखाद्या प्रश्नावर चर्चा करण्याचं सौजन्य नसेल तर त्यांना प्रसारमाध्यमांतील चर्चांतून वगळलं पाहिजे. आता तर सूत्रसंचालकांचंही त्यांच्यावरचं नियंत्रण सुटत चाललंय. आता हे काय नवे मध्यमवर्गीय शिष्टाचार आणि मूल्यं आहेत का? कधी काळी भारतीय सभ्यता अशी होती की, दुसऱ्याच्या मतांशी कोणी कितीही असहमत असलं तरीही वाद-विवादात विरोधी मतांचा आदर करण्यात प्राधान्य दिलं जातं असे. बुद्धिवादविरोधी संस्कृती या विवादास्पद मूल्यावर आधारित सार्वजनिक मत तयार करण्यात गुंतलेली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा निषेध करणाऱ्या बुद्धिजीवींवर असहिष्णुतेचा आरोप करत आहे, हे वाचून हसू आलं. कारण हे बुद्धिजीवी संघानं निश्चित केलेल्या हिंदुत्वाच्या व्याख्येशी सहमत नाहीत. बुद्धिजीवी माणसानं संघानं मांडलेली एकच विचारसरणी मान्य केली पाहिजे असा याचा अर्थ आहे का? वाद-विवादाला एका सौजन्यपूर्ण संवादाची गरज असते. जे कुणी आपल्या विचारसरणीशी असहमत आहेत त्यांना विषारी अन वाईट वागणूक दिली पाहिजे असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनुयायांना आहे. तेव्हा तिथं संवादच असू शकत नाही.पण जर मोठा संवाद व्हायचा असेल तर अनिवार्यपणे हे विचारायला हवं की, केंद्र सरकार हा गोंधळ संपवायला काय करू शकतं? पक्षातील जे कोणी विद्वेषपूर्ण वक्तव्यं करतायत आणि हिंसा व दहशतीच्या कृत्यांमध्ये सहभागी आहेत,

त्यांच्यापासून सरकारला दूर ठेवून ते स्वत:ला शुद्ध करू शकतात. सरकारनियुक्त लोकांचं नियंत्रण घालवून आणि संस्थांच्या बौद्धिक गुणवत्तेत सुधारणा करून त्या व्यावसायिक समित्या स्वायत्त व उच्चभ्रू वर्गाच्या व व्यावसायिक लोकांच्या कृतीसाठी जबाबदार बनवू शकतात. प्रशासनात केवळ राजकीय पक्षाच्या निवडक सदस्यांकडून नव्हे, तर योग्यता असलेल्या लोकांची व्यापक सल्लामसलत व सहभाग असेल तरच सरकारच्या सच्चेपणाच सुधारणा होऊ शकते. प्रश्न असा आहे की, हे होईल का?

मराठी भाषांतर : मेघा पानसरे
( *आपले वाङ्मय वृत्त* मासिकाच्या नोव्हेंबर २०१५च्या अंकातून)